# देगलूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस संपन्न

**उर्जावृत्तसेवा,**

**देगलूर** –अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय,देगलूर आणि ५२ महाराष्ट्र एन सी सी बटालियन,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय छात्र सेना विभागातील कॅडेटस्च्यावतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्यांने आंतरराष्ट्रीय योग दिवस आयोजन करण्यात आले आहे.

या योग दिनी देगलूर महाविद्यालयचे व मानव्य विकास विद्यालय देगलूर चे छ्उउ कॅडेट्स सहभागी होते तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते या आंतराष्ट्रीय योग दिनी प्रशिक्षक म्हणून प्रा ओमप्रकाश मानधना व कृष्णा पाटील यांचा मार्गदर्शन लाभले या प्रसंगी अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिनी सदस्य रविंद्र द्याडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उप प्राचार्य डॉ.अनिल



चिद्रावार व एन. सी. सी. चे विभागप्रमुख लेफ्टनंट डॉ. निरजकुमार उपलंचवार, गिरीश पारशेवार व या कार्यक्रम करीत ५२ महाराष्ट्र बटालियन चे कर्नल एम. रंगाराव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या कार्यक्रमा करीता एन.सी.सी.चे सिनिअर अक्यमवार साईराम यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले आहे.

Scanned with OKEN Scanner